श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष २ रें.] श्रावण शके १८४७ [अंक ५ वा.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... [illegible]

स्फुट विषय ... ... ... ... ... [illegible]

श्री साईसच्चरित ... ... ... ... [illegible]

519-5[illegible]



## विनंती

या मासिकाचें वर्ष चैत्रापासून सुरू असतें. अजून शके १८४६ चीही वर्गणी कित्येकांची आलेली नाहीं. गेल्या फाल्गुनाचे अंकांत आग्रहाची विनंती केली असूनही पुष्कळ वर्गणीदारांकडून शके १८४७ सालची वर्गणी अजून आलेली नाहीं. तरी वर्गणीदार आपली वर्गणी वेळेवर पाठवतील अशी उमेद आहे.

## वर्गणीचे दर

वार्षिकवर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरने अगाऊ रु.३।≈ व्ही. पी. नें रु. ३॥ चालू अंक ।≈ मागील अंक शिल्लक असल्यास -॥-

पूर्वीच्या अंकात व्ही. पी. नें रु. ३॥≈ चुकून छापलें गेलें. असेच यंदा ज्या कांहीं वर्गणीदाराकडे रु. ३॥। ची व्ही. पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचेकडें जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पांठवून देऊं



रामनवमीची निशाणांची मिरवणूक.

साईभक्तिपरायण ति. भाऊसाहेब-हरी सीताराम दीक्षित-यांस शि. सा. न. वि. वि.:—

मी श्री सद्गुरुसाईनाथ महाराज यांच्या विषयींचे अनुभव लिहून आपणांकडे पाठवीत आहें. योग्य वाटल्यास श्रीसाईलीलेंत सवडीनुसार प्रसिद्ध करण्याची व्यवस्था व्हावी.

माझा जन्म पुण्यास झाला. तेथें माझे वडील मिलिटरी अकाउंट आफीसमध्यें नौकरीस चांगल्या हुद्यावर होते. त्यावेळीं श्री अक्कलकोट-निवासी स्वामीमहाराजांची कीर्ती दशदिशा पसरत चाललेली होती.

याचवेळीं महत्भाग्यानें मुंबई कामाठीपुरा येथून स्वामीसुत, पंडित व नगरचे नाना जोशी रेखे हे अक्कलकोटास जाण्यासाठीं दिंडी घेऊन निघाले होते. ते कोंडोपंत छत्रे यांच्या वाड्यांत आम्ही रहात होतों तेथें येऊन उतरले. त्यांच्याबरोबर आमचे वडील मला घेऊन अक्कलकोटास गेले.

दर महिन्यास ते पंढरपूरच्या वारीसारखें अक्कलकोटास जात असत. त्यांच्याबरोबर वारंवार मीही जात असें. तेथील चमत्कार व हकीकत सांगण्याची ही जागा नसल्यामुळें येवढें प्रास्तविक लिहून मुख्य मुद्याकडे वळतों.

नेहमीं दर्शनाचा योगायोग येऊन मला व स्वामीसुताची मुलगी सिद्धाबाई जी हल्लीं चेंबूर येथें श्री समर्थांचा नवीन मठ स्थापन करून व तेथें स्वामी समर्थांची सेवा मनोभावानें करून स्वामीसुताच्या कार्याचा प्रसार करीत आहे या दोघांना श्री समर्थांच्या आंगावर खेळावयास व त्यांचें दूध प्यावयास सांपडत असे. आईच्या स्तनांतून दुधाच्या धारा निघून लेंकरांचे पोट भरावें याप्रमाणें यथेच्छ अमृतपानानें आमचें पोट भरत असे.

अशा आनंदांत वेळ जात असतां श्रीसद्गुरू व त्यप्पा महाराज ज्यांचा अक्कलकोटांत मठ आहे, त्यांची तार आमचे वडिलांस आली कीं तातड-तोब अक्कलकोटास निघून यावें. श्रीसमर्थ आपलें अवतारकार्य आटोपून आम्हां सर्वांस दुःखार्णवांत टाकून जातील असें वाटतें.

वडिलांनी तार पहातांच मला घेऊन अक्कलकोटास जावयाची तयारी केली. आम्हीं जाऊन पोहोंचलों, महाराजांची आवडती कामधेनू टाहो फोडीत होती.

भक्तजन दुर्गुखलेले असे बसले होते. अक्कलकोटांत जिकडे तिकडे हाहा:कार उडालेला होता. राजापासून रंकापर्यंत सर्व हवालदिल झाले होते तरी जो तो आपापलें महाराजांस जें विचारावयाचें होतें तें तें विचारीत होता. महाराज सर्वांस उत्तरें देऊन त्यांचें समाधान करीत होते.

आमच्या वडिलांनीं महाराजांस इतर कांहीं न विचारतां विनंती केली कीं, महाराज, मला व या मुलाला आतां कोणाचा आधार आहे ?

आपल्या मागें येथें जमलेल्या भक्तमंडळींनीं कुणाकडे पहावें. श्री समर्थांनीं आपल्या चर्मपादुका माझ्याकडे उडवून यांची पूजा करीत जा व जिल्हा अहमदनगर येथें नजीकच शिर्डी गांवांत माझाच अवतार होणार आहे तेथें नित्यशः जाऊन माझ्या ठिकाणीं जें प्रेम आहे तेंच ठेवीत जा म्हणजे तुला माझी आठवण न पडतां सुखानें रहातां येईल.

याप्रमाणें तेथें कांहीं दिवस राहून रा. रा. लक्षुमणपंडित वे. शा. रा. नाना बापुजी रेखे जोशी व आम्ही दोघेजण असे मिळून शिर्डीस आलों.

वाटेंत पंडित रेखे जोशी यांनीं आमचे वडिलांस सांगितलें कीं आम्हाला शिर्डीस रहात असलेला वेडा फकीर ठाऊक आहे. महाराजांनीं तुमची समजूत घातली. आम्हीं मुसलमानाच्या पायां पडणार नाहीं तुम्हांस पाहिजे तर तुम्ही पायां पडा व समर्थ म्हणून वारंवार तेथें जाऊन सेवा करा.

पण आमच्या वडिलांचा निश्चय न ढळतां ते तेथें त्या सर्वांना घेऊन गेले. वेडया फकिराची व सर्वांची दृष्टादृष्ट होतांच ते आपल्याशींच पुटपुटावयास लागून वाटेंत झालेलें भाषण बोलावयास लागले. आणि आमच्या वडिलांकडे व माझ्याकडे पाहून म्हटलें कीं, ते दोघेही कर्मठ ब्राह्मण आहेत तूं व तुझा मुलगा वाटल्यास येत जा. व मला समोरील लिंबाचें झाड दाखवून त्याचा पाला आणावयास सांगितलें. तो आणल्यावर सर्वांस देऊन खाण्यास सांगितलें. त्या दोघांस तो अतिशयित कडू लागला व आम्हीं दोघांस तो इतका गोड लागला कीं तो आम्ही उभयतांनीं यथेच्छ भक्षण केला, व वर पाणी पिऊन ढेंकर देत बसलों.

त्या दोघांचा जोव ओकतां ओकतां बेजार झाला. आमच्या वडिलांस कडू लिंबाची खूण पटली. श्रीसमर्थ अक्कलकोटचे स्वामी यांनीं अक्कलकोट येथें कडूलिंबाच्या झाडाची अर्धी बाजू गोड करून दाखवून गाणगापुराहून आलेल्या दत्तभक्तांस आपण–नृसिंहभक्त–आहोंत हें दाखवून दिलें. कारण गाणगापुराला बऱ्याच वर्षांपूर्वी या प्रकारचें झाड देवळाजवळ होतें.

श्री. साईनाथांनीं आपण–श्री अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराजांचें अवतार आहोंत–हें त्यावेळीं निदर्शनास आणून दिलें व आतां तें खरें करून दाखविलें आहे. या वेळचा फोटो नुकताच माझे पहाण्यांत आलेला आहे. कुणास पहावयाचा असल्यास मजकडे आहे. मी श्रीसाईनाथांचे तीन प्रकारचे चेहरे एके ठिकाणीं तसबिरींत मढवून ठेविले आहेत. हा चेहरा शिर्डी येथें परभू जातीचे बाळाराम नांवाचे महाराजांचे भक्त होते त्यांच्या मुलास ते साईपदीं लीन झाल्यावर त्यांच्या पुस्तकांत सांपडला. त्यावरून कै० वा० रा. रा आत्माराम बाळाजी स्टॅंपव्हेंडर यांनीं कांप्या काढून मला दाखवतांच त्या गुरुमुर्तींस पाहून मला अत्यंत समाधान झालें.

असो. वडिलांच्या मागें मी केव्हां तरी शिर्डीला जात असें. एके वेळीं असा सुयोग आला कीं, येथील गणपत कृष्णाजी यांच्या घरीं आनंदनाथ महाराज नांवाचे गौडब्राह्मण वेंगुर्लें येथील रहाणारे असत ते अक्कलकोटस्वामींचे निस्सीम भक्त असून समर्थांवर नित्य नवीन अभंग, पदें, वगैरे करून भजनानंदांत निमग्न असत, व श्रीसमर्थांप्रमाणें चमत्कार करीत असत. त्यांच्या दर्शनाला गेलों असतां त्यांनीं निरूपणांत शिर्डीच्या वेड्याला वेडा व मुसलमान म्हणतात ते वेडे असून आपल्या स्वहिताला मुकत आहेत तरी ज्यांस आपलें स्वहित साधावयाचें असेल त्यांनीं त्यांस शरण जाऊन आपलें सार्थक करून घ्यावें. हे दुसरे कोणी नसून प्रत्यक्ष भगवंताचे अवतार, श्रीस्वामीसमर्थ माऊली आहेत. मग काय विचारतां मनांतील खूण पटल्यामुळें मला जो महदानंद झाला तो विचारूं नका.

पुढें आजदिनपर्यंत समर्थ दर्शनास अक्कलकोटास जाण्यापूर्वी शिर्डीला प्रथम जाऊन नंतर अक्कलकोटास व दत्तस्थानास जात असतों. यापुढें

माझ्यावर आलेली संकट परंपरा व साईनाथांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने केलेली सुटका ही मनोवेधक हकिकत लौकरच पाठवितो.

मोतीवाला जैन ब्लाक नं० ११ ताडदेव-पुलाचे डावे बाजूला पायथ्याजवळ ताडदेव ग्रांटरोड पोष्ट आफीस. मुंबई नं ७

आपला सदोदित नम्र
रामचंद्र केशव नाईक,
दत्तदासानुदास २५-५-२५.

मी माझ्या मुलीला स्थळें पहाण्यास टीं एकसारखा दोन वर्षे हिंडत होतों. तीन तीन महिने रजा घ्यावी आणि पुण्यास जाऊन बसावें असा दोन वर्षे क्रम होता. पुढें कोठें जमत नाही म्हणून अगदीं निराश होऊन गेलों. एक दिवशीं मी माझे स्नेह्याचे घरीं साधुसंताच्या गोष्टी बोलत बसलों होतों. त्यांत श्री साईबाबांचें नांव निघालें. तेव्हां माझे स्नेही मजला म्हणाले "गोविंदराव" जर आजपासून पंधरा दिवसांचे आंत तुमचे मुलीचें लग्न जमलें तर आपण शिर्डीस साईबाबांचे दर्शनास जाऊं." त्यांचें म्हणणें मी कबूल केलें. पुढें असा चमत्कार झाला कीं, दक्षिण हैद्राबाद येथीलहर्डीकर यांचा मुलगा स्वतः मुलगी पाहून लग्न करण्याचा बेत करून मुली पहात पहात मी जेथें रहात होतों तेथें येऊन माझी मुलगी पसंत करून गेला. व लगेच पुढल्याच मुहूर्तावर लग्न झालें. स्नेही म्हणाले त्याप्रमाणें पंधरा दिवसांत लग्न झालें सबब आम्ही शिर्डीस जाण्यास निघालों. जातांना मी माझे स्नेह्यापासून वीस रुपये उसनें घेतले होते. शिर्डीस गेल्यावर श्री मारुतीचे देवळांत थोडा वेळ बसून नंतर मशिदींत गेलों. तेव्हां श्रींची स्वारी तेथें नव्हती. मशिदींतील निंबरास नमस्कार करून बसतों, इतक्यांत तेथील शिष्यांनीं मजला सांगितलें कीं बाबा रागवले आहेत तुम्ही बाहेर जा नाहीं तर तुम्हांला मार मिळेल; काल्च त्यांनीं एका इसमास मारिलें. मीं त्यांस विचारलें महाराज कोठें आहेत ? तेव्हां त्यानीं ते बहिर्दिशेस गेले असल्याचें मजला सांगितलें व आधीं तुम्हीं येथून बाहेर जा म्हणून मजला म्हणाले; त्याप्रमाणे आम्ही बाहेर उठून आलों व महाराजांचे येण्याचे वाटेवरच उभे राहिलों इतक्यांत श्रींची स्वारी हंसत, व डुलत येतांना आम्ही पाहिली. मशिदींतील शिष्य

आपापसांत बोलूं लागले कीं मघाशी बाबांची स्वारी रागावली होती व आतां पहावें तों हंसत व डुलत येत आहे हा काय चमत्कार आहे ?

श्रीची स्वारी मशिदीचे पायरीवर उभी राहिली व "न्हानेकू पानी लाव" असे शिष्यांस म्हणाले. तेव्हां शिष्यांनीं श्रीचे चरणावर पाणी ओतलें. तेथें मी गेलों व श्रींचे चरणाचें तीर्थ घेतलें. नंतर श्रींचे पुढें विडासुपारी नारळ व एक रुपया दक्षिणा ठेवून श्रींचे चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां श्री ( बाबा ) मजला म्हणाले कीं, तूं माझे पायावर मस्तक ठेवूं नकोस. दुरून नमस्कार केलास म्हणजे मला पोहचेल. तरी मी पुन्हा बाबांचे चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला. त्यावेळींही पुन्हां त्यांनी पूर्वीप्रमाणेंच दुरून नमस्कार करण्यास सांगितलें. नंतर पुढें ठेवलेली दक्षिणा पाहून बाबा मजला म्हणाले." आणखी एक रुपया ठेव एकच कां ठेवलास ? तेव्हां मी आणखी एक रुपया ठेवला. व माझे स्नेह्यांस बाबांचे पुढें ठेवण्याकरितां मी एक रुपया देऊं लागलों. तेव्हां बाबा मजला म्हणाले' त्याला तूं देऊं नकोस त्याच्या खिशांत एक रुपया आहे. व खरोखरच माझे स्नेह्याचे खिशांत एकच रुपया होता.

इतकें झाल्यावर बाबांनी ते रुपये उचलून मजकडे पहात म्हणूं लागले, मजला तीस रुपये देणें झालें आहे. असें एक दोन वेळ्ते मजकडे पाहून म्हणाले. वास्तविक ते बाबांना देणें झालेलें नसून मी तीस रुपये उसने काढून बाबांचे दर्शनास गेलों होतों त्याची खूण त्यांनीं मला पटवून दिली.

दुसरा चमत्कार असा कीं तेथें बापूसाहेब या नांवाचे गृहस्थ बाबांचे सेवेस होते त्यांची बहीण तेथें दर्शनास आली होती बाबांनीं. तिला बापूसाहेब काय करीत आहेत म्हणून विचारिलें. ती म्हणाली ते निजले आहेत. तेव्हां बाबा एका शिष्यास म्हणाले " नारायण तो बापूसाहेब येथें आला म्हणजे त्याला चांगला मार दे " माझे त्याचेकडून तीन चार हजार रुपये येणें आहेत. तो देतों देतों म्हणून म्हणतो पण देत नाहीं. याचीही खूण मला पटली.माझे स्वतःचे तीन चार हजार रुपये येणें होते. ज्यांचेकडून येणें होते त्याचेंही नांव बापूसाहेबच होतें.

निघतांना बाबा मजला म्हणाले की मी तुजबरोबर येतों. येथें लोक मला फार त्रास देतात.याचा अर्थ मला कांहींच समजला नाहीं.पाया हल्लमा रा.रा.माधवराव देशपांडे नुकतेच पळस्प्यास येऊन गेले त्यावेळी त्यांनी केला, येथें ( पळस्पे येथें ) आमचे घरापासून जवळच एक वडाचें झाड आहे व त्याचे खालीं एक लहानसा पीर आहे तो मी रा. स. माधवरावांना दाखविला. तेव्हा माधवराव मजला म्हणाले कीं, बाबा तुम्हाला ज म्हणाले की मी तुजबरोबर येतों, तें खरें आहे. ते ह्याठिकाणीं आहेत. असो.

नंतर बाबांनी मजला उदी दिली. व माझे मस्तकावर हात ठेवून कपाळास उदी लावली. नंतर आम्हीं बाबांची परवानगी घेऊन परत येण्यास निघालों.

गोविंद दामोदर पंडीत.
मु० पो. पळस्पें. ता. पनवेल. जि. कुलाबा.

अहमदनगरचे दामूशेट कासार हे महाराजांचे पूर्ण भक्त आहेत. रामनवमीला दोन निशाणें लागतात त्यापैकीं एक दामूशेटचें असतें ही हकीकत मागील अंकांत आली आहे. दामूशेट महाराजांकडे इ. सन १८९५ पासून जाऊं लागले. हल्लीं मशीदींत असलेलें मोठें उद्दान हें दामूअण्णानींच महाराजांना दिलेलें आहे.

अहमदनगर शिर्डीपासून जवळ असल्यामुळें शिर्डीस दामुशेट वरचेवर जात असत. परंतु प्रथम प्रथम महाराज त्यांना शिर्डीस राहूं देत नसत. दामूअण्णांना महाराजांचा सारखा निदिध्यास लागलेला व त्यांची मूर्ती नेहमीं समोर दिसे. महाराज त्यानांस शिर्डीं राहूं देत नसत म्हणून ते खिन्न असत. अशा स्थितींत दामूअण्णांची बहीण वारली. त्यामुळें त्यांची उदासीनता द्विगुणित झाली. तसेच ते शिर्डीस गेले. महाराजांनीं सुतकांतच त्यांना वर मशीदींत बोलाविलें व शांतवनपर उपदेश केला. अप्पा कुळकर्ण्याकडे पुरण पोळीचा जेवणाचा बेत करविला व दामू शेटला गोंधळ लावून पुरणपोळी खाऊं घातली.

दुसऱ्या उरुसाचे वेळीं दामूशेटनें नैवेद्य केला व महाराजांना जेवाव-याला बोलाविलें. नेवास्याच्या बाळा पाटलाला ( हा महाराजांचा परम भक्त होता ) जेवावयाला पाठविण्याची महाराजांना विनंती केली, महाराज म्हणाले, तुम्हीं त्याला दूर बसवाल, " धुत् धुत् " कराल तरी पण शेवटीं परवानगी दिली. वेळेवर दामू शेटनें महाराजांकडे नैवेद्य पाठविला व बाळा पाटलाला शेजारीं मध्यें घेऊन ते जेवावयाला बसले, इतक्यांत एक मोठा काळा कुत्रा चिखलांत भरलेला असा तेथें आला. जेवणाचे वेळीं असें कुत्रें आल्यास कोणीही मनुष्य त्याला ' हड हड ' करून हांकून देईल. परंतु दामूशेटला लगेंच " धुत् धुत् कराल " या महाराजांच्या शब्दांची आठवण झाली व आपली कसोटी पहाण्याकरितांच हा कुत्रा महाराजांनी पाठविला अशी त्यांची भावना होऊन त्यांनीं त्याला न हाकलतां खाऊं घातलें व सर्वांनीं भोजन केलें. *

नगरास दामूशेटचे घरीं चोरी झाली. ही चोरी त्यांच्या तेहतीस वर्षांच्या जुन्या गड्यानें केली होती. किल्ल्या लावून त्यानें डागिन्यांचा डबा चोरला होता. या डागिन्यांत कुटुंबांतील जुन्या नथी ज्या शुभ मानल्या जात असत त्या होत्या व त्याबद्दल दामूअण्णांना फार हळहळ वाटली. इतक्या जुन्या गड्याची अशी बुद्धि फिरावी याबद्दलही त्यांना फार वाईट वाटलें व सरकारदरबार करूं नयें असें त्यामुळें वाटूं लागलें. गड्याला पुष्कळ धाकदपटशा व लालूच देऊन पाहिली पण तो दाद देईना. झालेल्या नुकसानीपेक्षां कुटुंबांतील शुभ सौभाग्यालंकार गेल्याबद्दल त्यांना फार वाईट वाटत होतें. शेवटीं त्यांनीं महाराजांचें तसबिरीपुढें बसून महाराजांना आळविलें व आपला तक्रारी अर्ज महाराजांकडे गुदरला. महाराज हेंच त्यांचें कोर्ट. लगेच दुसरे दिवशीं त्या गड्यानें आपण होऊन चोरलेला डबा जशाचा तसा दामूशेटचे स्वाधीन केला व क्षमा मागितली.

* कुत्र्या मांजरांना खाऊं घालावें त्यांचा तिटकारा करूं नये अशी महाराजांची शिकवण असे. एकदां नानासाहेब डेंगळे यांनीं चांदीच्या ताटांत महाराजांना नैवेद्य आणला. ताट खालीं ठेवल्यावर त्याला एका कुत्र्यानें तोंड लावलें तें पाहून डेंगळ्यांना वाईट वाटलें व मनांत विकल्प आला. त्याचा परिणाम असा झाला कीं महाराजांनीं नैवेद्य न स्वीकारितां तें ताट भिरकावून दिलें. डेंगळ्यानीं त्यापासून धडा घ्यावयाचा तो घेतला.

दामूशेटला आपला वडील मुलगा तानाशा याची सोयरीक करावयाची होती. दोन पत्रिका आल्या होत्या. एक मामाच्या मुलीची २५००-३००० रु. पर्यंत ते हुंडा द्यावयाला तयार होते. दुसरी पत्रिका एका गरीबाच्या मुलीची होती.. त्यांना हुंडा वगैरे देण्याची ऐपत नव्हती. या दोन्ही पत्रिका घेऊन दामूशेट शिरडीस गेले व माधवरावांना बरोबर घेऊन महाराजांकडे आले. दोन्हीं पत्रिका महाराजांना दाखविल्या व कोणती सोयरीक करावयाची म्हणून माधवरावांनीं विचारलें. पत्रिका हातांत घेऊन महाराजांनीं गरीबाच्याच मुलीची पत्रिका पसंत केली. अर्थात त्याप्रमाणें दामूशेटनीं त्याच मुलीची सोयरीक केली.

२५००-३००० रु. हुंडा सोडून गरीबाची मुलगी केल्याबद्दल दामूशेटला लोकांनीं नांवें ठेवलीं, परंतु त्यांनीं पैशाच्या लोभांत न पडतां महाराजांची आज्ञा पाळली व तानाशा आज त्या मुलीबरोबर फार आनंदांत संसार करीत आहेत.

सुमारें वीस वर्षांपूर्वी बुंदेलखंडाकडील दोन दक्षिणी ब्राम्हण शिरडीस महाराजांचे दर्शनाकरितां आले. दर्शनास कोणी मंडळी आल्यास त्यांना महाराजांकडे घेऊन जाण्याचें काम माधवराव देशपांडे नेहमीं करीत असत. त्याप्रमाणें या दोघां बंधूना घेऊन माधवराव मशीदींत गेले. दोघेजण महाराजांना नमस्कार करून बसले. माधवरावही तेथें बसले. महाराज त्यांतील एका इसमाकडे हात करून माधवरावांना म्हणाले "शामा, याच्या जवळ रु. १५ मग." माधवरावांनीं मागितल्यावर त्या गृहस्थानें रु. १५ दक्षिणा दिली व महाराजांनीं तिचा स्वीकार केला. दुसऱ्या भावानें आपण होऊनच रु. ३५ महाराजांना अर्पण केले. महाराजांनीं ते रु. ३५ हातांत घेऊन पुन्हां त्या इसमास परत दिले. हें पाहून माधवराव म्हणाले, "देवा, असा व्यवहार नाहीं आपण पाहिला. तो आपण होऊन रु. ३५ देतो तर तुम्हीं घेत नाहीं व दुसऱ्याकडून १५ रु. मागून घेतां" महाराज त्यांवर प्रथम कांहीं बोलले नाहींत. कांहीं वेळानें ते म्हणाले, "शामा ते ३५ रु. आपले नाहींत. पण हे १५ रु. दत्ताचे आहेत. दत्तानें मशीदी आईला दिले." ( महाराज केव्हां केव्हां आपल्या मशीदीला " मशीदी आई"

म्हणत ) व नंतर गोष्ट सांगितली ती अशी:—मी फिरत फिरत एकदां एका ब्राह्मणाचे घरीं गेलों. त्यानें मला जेवूं खाऊं घातलें. मग मी तिथेंच निजलों. माझ्या खिशांत एकतीस हजार रुपयांच्या नोटा होत्या. मी झोंपेंत असतां कोणी खिसा कातरून त्या चोरल्या. जवळ खिडकी होती तिचा चिरा काढून चोर आंत आला जागा झाल्यावर पहातो तों नोटा नाहीत. मग मी त्या ब्राह्मणाला म्हणे माझ्या नोटा दे व खिन्न मनानें त्याच्या ओट्यावर बसून राही. असे कांहीं दिवस गेल्यावर एकदां एक फकीर आला व मला म्हणतो "बाबा असें उदास का दिसतां" तेव्हां मी त्या फकीराला माझ्या सर्व नोटा चोरीस गेल्याचें सांगितलें. त्यावर फकीर म्हणाला "तूं त्या फकीराला नवस कर व तुझ्या आवडीचा जो पदार्थ असेल तो सोडून दे म्हणजे तुला तुझ्या नोटा मिळतील" मला भात फार आवडे म्हणून मी तो सोडला व फकीराला नवस केला. १५ दिवसांनीं ब्राम्हणानें चिरा उकरून नोटा नेल्या होत्या त्या मला आणून दिल्या मला आनंद झाला. मग मी तेथून निघालों आणि फिरत फिरत गोव्याच्या रस्त्याला आलों. एका रात्रीं तो फकीर माझ्या स्वप्नांत आला व मला म्हणतो, "अजून त्या फकीराकडे गेला नाहींस ?" तेव्हां मी तिकडे जाण्याचा बेत केला. बोटीवर आलों तों बोट भरलेली. साहेब मला आंत घेईना. मग एका शिपायानें साहेबाला सांगितलें त्याला आंत घ्या तो आमच्याच मनुष्य आहे. तेव्हां साहेबानें आम्हाला बोटीवर घेतलें. मग मी मुंबईस आलों, व फकीराला भेटलों व माझें काळीज सुपाएवढें झालें. गोष्ट संपल्यावर महाराज म्हणाले, "श्यामा, यांना घरीं नेऊन जेऊं घाल." गोष्ट चालू असतां दोघां भावांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें माधवराव दोघांना घेऊन आपल्या घरीं गेले. जेवण झाल्यावर माधवरा त्या गृहस्थांना म्हणाले कीं मला महाराजांनीं जी गोष्ट सांगितली ती आपल्याला तर कांहीं समजली नाहीं परंतु ती होती तुमच्यावर. तुमच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहत होत्या, तेव्हां तुम्हांला कांहीं समजलें असेल तर सांगा. त्यावर त्यांतील एक गृहस्थ म्हणाले या गोष्टीनें महाराजांनीं आपले अंतर्साक्षित्व

आम्हांला चांगलें पटविलें. हकीकत अशी आहे कीं आम्ही दोघे मुंबई दक्षिणेंतले राहणारे. नोकरी. निमित्तें बुंदेलखंडांत गेलों. प्रथम तेथे मला पगार मिळूं लागला तेव्हां दत्ताला नवस बोललों होतों कीं १५ रु. देईन. हल्लीं मला पगार ८०० रु. मिळतो परंतु १५ रुपयांचा नवस फेडण्याचा विस्मरणानें राहिला तो राहिला. त्याची खूण महाराजांनीं आज देऊन १५ रु. मागून घेतले व नवसांतून मला मुक्त केलें. पगार चांगला मिळूं लागल्या-मुळें मज जवळ द्रव्य संचय चांगला झाला. पण एकदां माझ्या ब्राह्मणानें माझे घरीं चिराकाढून चोरी केली व एकतीस हजारांच्या नोटा चोरल्या. ब्राह्मण तीस वर्षांचा जुना होता. पोलिसांत चोरीची वर्दी दिली परंतु कांहीं पत्ता लागेना त्यामुळें मी फार खिन्न होतों. एकदां मजकडे एक फकीर आला व मला म्हणाला, मी शिर्डीहून आलों. तुम्ही शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनाला जाण्याचा नवस करा व आपला एखादा आवडीचा खाण्याचा पदार्थ सोडा म्हणजे तुमचे रुपये सांपडतील. त्याच्या सांगण्याप्रमाणें मी नवस केला व भात खाणें सोडलें. पुढें सुमारें १५ दिवसांनीं माझ्या ब्राह्मणानें आपण होऊन माझ्या चोरलेल्या एकतीस हजारांच्या नोटा आणून दिल्या. अर्थात मला अतिशय आनंद झाला व त्यांतले २००० रु. मी त्या ब्राह्मणाला बक्षीस दिले. पुढें २ । ३ महिन्यांनी कांहीं कामाकरितां गोव्याचे बाजूला आलों. एक रात्रीं दृष्टांत झाला व स्वप्नांत साईबाबा दिसले. तेव्हां तावडतोब नवस फेडण्याकरितां शिर्डीस जाण्याचा बेत केला व बोटीवर आलों, परंतु बोटींत जागा नाहीं. तेव्हां एका शिपायानें हीं आपलींच माणसें आहेत असें सांगून आम्हांला बोटीवर घेतलें. मुंबईस आलों व तेथून दर्शनास येथें आलों.

याप्रमाणें घडलेली हकीकत महाराजांनीं गोष्टीच्या रूपानें सांगितली तेव्हां साहजिकच आम्हीं चकित झालों व आमचे डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले.

## श्री शिर्डीसंस्थानचा तिसरा म्हणजे शके १८४६ चा रिपोर्ट

१ या वर्षांत श्रीशिर्डीसंस्थान कमिटीच्या ६ सभा भरल्या. त्यांत ज्या महत्वाच्या बाबी निघाल्या त्यांचा गोषवारा खालीं दिला आहे.

२ कायमफंड वाढविण्यासाठीं सवा रुपया, रुपया व चार आणे या दराचीं तिकिटें काढून त्या तिकिटांचीं पुस्तकें विश्वसनीय स्वयंसेवकांकडे विकावयास ठेवावीं असें कमिटीनें ठरविलें.त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली पण दिलगिरीची गोष्ट अशी कीं अद्यापपर्यंत त्या तिकिटांचा खप फारच कमी झाला आहे. प्रत्येक तिकिटाबरोबर महाराजांची लहान तसबीर दिली जाते.

३ दर गुरुवारीं महाराजांची पालखी मशिदींतून चावडींत मिरवत न्यावी आणि तेथें आरती करून तशीच मिरवीत श्री समाधिमंदिरांत नेऊन तेथें शेजारती करावी, असें कमिटीनें चैत्र शके १८४६ मध्यें ठरविलें आणि त्याप्रमाणें वहिवाट अव्याहत चालू आहे.

४ महाराजांचे जुने शेले—यांपैकीं एक धुवविला आणि एक रफू करविला. पण त्यांशिवाय ४ शेले फाटून निरुपयोगी झाले आहेत. पैकीं एक जो अत्यंत फाटला होता तो रा. रा. वसंतराव गोरक्षकर यांस देण्यांत आला व तत्प्रीत्यर्थ त्यांनीं पन्नास रुपये भरले. ते कायम फंडात जमा केले आहेत. बाकींच्या शेल्यांबद्दल अद्याप मागणी आली नाहीं. यासंबंधानें श्रीसाईलीला मासिकद्वारा आणि अन्य तऱ्हेनें प्रसिद्धी केली होती पण अद्याप कांहीं परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. शेल्याचा विषय फिरून कमिटीपुढें यावयाचा आहे.

५ श्रीसमाधीच्या पिछाडीच्या दरवाजांस कांचा बसवावयाचें ठरून त्याप्रमाणें कांचा बसविण्यांत आल्या आहेत.

६ श्रीसमाधीमंदिराचे सभामंडपांत संगमरवरी फरशी बसविली तिचा खर्च देण्याचें श्री. बुटी यांनी आनंदानें कबूल केलें आणि त्याप्रमाणें त्यांचे-

कडून त्या संबंधाची चुकती रकम आली यावद्दल अर्थात् संस्थान त्यांचे आभारी आहे.

७ श्रीमशिदीच्या उजव्या बाजूची भिंत पाडून तेथें गज बसवावे असें कमिटीनें ठरविलें आणि त्याप्रमाणें करण्यांत आलें त्यामुळें मशिदीचा देखावा सुधारून महाराजांच्या तसबिरीचें दर्शन बाहेरच्या भिंतीजवळूनसुद्धां होऊं शकतें.

८ श्रीगुरुपौर्णिमा उत्सव— हा पहिल्यापासून श्री. बुटी करीत आले आहेत. मध्यंतरीं त्यांनीं उत्सवाची सर्व व्यवस्था संस्थानाकडे सोंपवून उक्त रकम रु. पांचशें दरवर्षीं देण्याचें ठरविलें होतें पण चालू सालीं त्यांचा विचार बदलून सर्व व्यवस्था पुनरपि त्यांनीं आपल्या हातांत घेतली आहे.

९ महाराजांचे लेंडीवर आंबराई लावावी असें कमिटीनें ठरविलें आणि त्याप्रमाणें लावण्यांत आली आहे.

१० श्रीसमर्थांचेसाठीं एक लहान शेज तयार करवावी असें ठरलें. ही शेज लवकरच तयार करविण्यांत येईल.

११ अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टानें पास केलेल्या स्कीम (योजना) प्रमाणें कमिटीचे दहा सभासद दर तीन तीन वर्षांनीं निवडावयाचे. त्याप्रमाणें नवी निवडणूक शके १८४७ चे चैत्रांत होण्यासाठीं निवडणुकीच्या नियमांची अवश्यकता वाटल्यावरून त्याप्रमाणें नियम कमिटीनें केले ते या सोबत परिशिष्ट "अ" म्हणून जोडले आहेत. त्यांपैकीं सामान्य वर्गणीदारांसंबंधीं नियम ही पहिलीच निवडणूक असल्यामुळें तिला लागू करूं नयेत असें कमिटीनें ठरविलें. त्याप्रमाणें नवीन निवडणुकी झाल्या आहेत. पण त्या संबंधीची साग्र हकीकत शके १८४७ चे रिपोर्टांत नमूद केली जाईल.

१२ श्री संस्थान कमिटीचे अध्यक्ष ह. भ. प. दास गणू महाराज यांस तहाहयात सन्मान्य वर्गणीदार करावें असें सर्वानुमतें ठरविण्यांत आलें.

१३ सोबत भक्तमंडळाच्या एकंदर सभासदांची यादी परिशिष्ट "ब" म्हणून जोडली आहे.

१४ नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें यंदाच्या जमाखर्चाचा आढावा संस्थानचे आडिटर रा. रा. शिवाजी कृष्ण परुळकर यांनी तपासून पास केला आहे. व तो सोबत परिशिष्ट "क" म्हणून जोडला आहे. रा. परुळकर कांहीं मोबदला न घेतां संस्थानचे हिशेब तपासून देतात याबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

१५ शके १८४६ चें बजेट सोबत "ड" परिशिष्ट म्हणून जोडलें आहे. त्यांतील आंकडयांची वरील आढाव्यांतील आंकडयांशीं तुलना करून पाहिलें असतां असें आढळून येईल कीं, भोजनखर्च, मुंबई ऑफीस खर्च व भांडीं दुरुस्ती या तीन रकमांशिवाय बाकीच्या सर्व रकमा बजेटच्यापेक्षां कमीच आहेत. भोजनखर्चाची रकम वाढण्याचें कारण असें कीं, त्यांत "मुक्या" नांवाच्या मुसलमानाला दिली जाणाऱ्या बाजरीची किंमत घालावी लागली. या बाजरीची किंमत पूर्वी महाराजांचे एक भक्त देत असत. आणि ती भक्तांचे धर्मकृत्य खात्यांत खर्ची पडत असे. यंदा कांहीं अडचणीमुळें त्या भक्ताकडून ती रकम येईनाशी झाली. म्हणून हा खर्च भोजनखर्चांत घालावा लागला. ही रकम जर वजा केली तर भोजनखर्चाची रकम बजेटांत घातलेल्या रकमेपेक्षां कमी होईल.

तसेंच मुंबई ऑफिसच्या खर्चाचे रकमेंतून नवीन निवडणुकीसंबंधी छापणावळ, पोस्टेज, जाहिरात वगैरे झालेला खर्च रु. ७७।≈ वजा केला तर बाकीची रकम बजेटांतील रकमेपेक्षां कमी होईल.

संस्थानचे भांडीं दुरुस्तीसाठीं पन्नास रुपये मंजूर केले होते, पण वास्तविक लागलेला खर्च ६४॥. रु. झाला म्हणून कमिटीची जास्त झालेल्या रकमेबद्दल ता० १५-७-२४ चे सभेंत मंजुरी घेतली.

१६ संस्थानचे कागदपत्र ठेवण्यासाठीं एक लाकडी कपाट घेतलें. त्याची किंमत रु. ९४; लाकडी सामान या सदराखालीं आढाव्यांत नमूद केली आहे. त्यासाठीं कमिटीची मंजुरी ता. १५-७-२४ चे सभेंत घेण्यांत आली होती.

१७ हें संस्थानकमिटीचें तिसरें वर्ष असल्यामुळें तीन वर्षांच्या त्याच्या आंकड्यांची तुलना करणें अयोग्य होणार नाहीं. ती तुलना येणेंप्रमाणें

उत्पन्न

| | शके १८४४. | शके १८४५. | शके १८४६. |
|---|---|---|---|
| | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| मासिक वर्गणी. | १५८२-७-६. | १०९७-१५-६. | ८५०-१५-३. |
| वार्षिक वर्गणी. | ६५६-४-०. | ५५६—०-०. | ८३४—०-०. |
| पेटीचें उत्पन्न. | ७३०-६-९. | ८८९—७-३. | ८०१-१०-०. |
| कायम फंड. | ३७०९-४-९. | ३६२४—७-०. | ४११७-१४-३. |
| कोठी. | १५८-५-०. | ५९—२-०. | १७—०-६. |
| व्याज. | ०-०-०. | २१०—०-०. | ५६२—०-६. |

१८ वरील तक्त्यावरून असें दिसून येईल कीं आपले मासिक वर्गणीचें मान दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. या गोष्टीकडे भक्तांचें लक्ष अवश्य गेलें पाहिजे. अर्थात् कायम फंड पुष्कळ वाढला तर वर्गणीवर फारसें अवलंबून राहावें लागणार नाहीं. म्हणून तो वाढविण्याकडेही मंडळीचें लक्ष गेलें पाहिजे. शके १८४६ अखेर कायम फंडाची रकम ११५११-१०-० इतकी झाली पैकीं रु. ९६५६-९-० खर्चून रु. ९५०० चे बॉंड घेतले आहेत त्यांचा तपशील-

| | | बाड घेतले ते |
|---|---|---|
| शके १८४४ रु. | ३५५४-१-० | ३५०० चे ६ टक्याचे |
| शके १८४५ रु. | २०५५-५-४ | २००० ,, |
| ,, १८४६ रु. | ४०४७-२-८ | ४००० ,, |
| एकूण रुपये | ९६५६-९-० | ९५०० ,, |

याशिवाय धी इंपिरीयल ब्यांकमध्यें सेव्हिंग ब्यांक खात्यांत संस्थानची बाकी वर्ष अखेर रु. १४४५-७-६ होती.

१९ संस्थानचे मुख्य चार उत्सवांची हकीकत नेहमींप्रमाणें श्री सांईलीला मासिकांत छापून आली आहेच. त्याबद्दल निराळें लिहिणें नको. मात्र निरनिराळ्या उत्सवांचे उत्पन्नाचे व खर्चाचे आंकडे खालीं दिले आहेत.

| | उत्पन्न. | खर्च. | शिलक. अगर तूट |
|---|---|---|---|
| रामनवमी— | ११६७-३-० | १२२६-११-० | -५९—८-० |
| गुरु पौर्णिमा— | ९१६-९—६ | ४६२—१-६ | ४५४—८-० |
| गोकुळअष्टमी— | ३३९-१५-० | ३१९-१३-९ | २०—१-३ |
| पुण्यतिथि— | १०३०-१३-० | ५८६-१४-६ | ४४३-१४-६ |

येणेंप्रमाणे हकीकत सादर केली आहे. यावरून संस्थानची स्थिति महाराजांचे कृपेनें बरी आहे असें दिसून येईल. तरी पण कायम फंडाची रक्कम यापेक्षां बरीच वाढली पाहिजे. आणि तोंपर्यंत वर्गणीदारही वाढले पाहिजेत. यासाठीं शक्य तो प्रयत्न प्रत्येक भक्तानें करावा. आणि त्या प्रयत्नास महाराज यश देतील असा भरवसा वाटतो.

शेवटीं गतवर्षी प्रमाणेंच "देवा सांईनाथा त्वत्पदनतभावें ॥ परमाया मोहित जनमोचनझणि व्हावें ॥ त्वत्कृपये सकळांचें संकट निरसावें ॥ देशिलतरिदेत्वद्यशदासाने गावें ॥" अशी महाराजांची प्रार्थना करून हा रिपोर्ट संपवितों.

शिर्डी शकें १८४७ आषाढ शु. १४ ता. ५ जुलै १९२५

दासगणू
अध्यक्ष.

हरि सीताराम दीक्षित.
चिटणीस.

परिशिष्ट

श्री सांईनाथ

श्री शिर्डी संस्थानचा शके १८४६ च्या

जमा.

| | रुपये | आ. | पै. |
|---|---|---|---|
| श्री शिल्लक मागिल वर्षाची | १६८३ | १५ | ० |
| श्री मासिक वर्गणी खाते जमा | ८५० | १५ | ३ |
| श्री वार्षिक वर्गणी खाते जमा | ८३४ | ० | ० |
| श्री सांईनाथ सगुणोपासना पुस्तक विक्री खाते जमा | १ | ४ | ० |
| श्री व्याज खाते जमा | ५६३ | ७ | ० |
| धी इंपीरियल ब्यांक खाते जमा | ४०४७ | २ | ८ |
| कै० दामोदर घनःश्याम बाबरेकर इस्टेट खाते जमा | ३०७ | ० | ० |
| रा. शामराव रामचंद्र जयकर खाते जमा | २ | ० | ० |
| श्री कोठी खाते जमा | ९७ | ७ | ६ |
| श्री पेटी ” ” | ८०९ | १० | ० |
| श्री कायम फंड खाते जमा | ४१९७ | १४ | ३ |
| श्री भक्तांचे धर्म कृत्य खाते जमा | १६५ | १ | ० |
| | १३५५९ | १२ | २ |

मी वरील जमाखर्चाचा अडावा हिशोबावरून तपासला तो बरोबर आहे. कायम फंडाच्या सिक्युरिटीझ मी पाहिल्या आहेत.

J. K. Parulkar

Bombay 26 June 1925 Certified Auditor.

( क )

प्रसन्न

## जमाखर्चाचा आढावा.

नावें.

| | रुपये. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| भक्तांचे धर्मकृत्य खातें नावें. | | | |
| श्री दक्षणा ,, ,, | १८७ | १५ | ६ |
| श्री भोजन ,, ,, | ३४१ | ० | ० |
| तसलमात ,, ,, | २२६ | २ | ६ |
| धुणी सर्पण ,, ,, | १४ | ११ | ० |
| श्री नंदादीप ,, ,, | ५० | ९ | ० |
| श्री शिर्डी किरकोळ खर्च खातें. | १५८ | ५ | ३ |
| श्री मुंबई आफीस खर्च खातें. | १०४ | १ | ९ |
| श्री इंपिरिअल व्यांक खाते नावें. | २३३ | ६ | ९ |
| लाकडी सामान ,, ,, | ४११३ | ७ | ६ |
| स्थावर दुरुस्ती ,, ,, | ४४ | ० | ० |
| श्री संस्थान भांडीं ,, ,, | १५३ | ६ | ६ |
| श्री कायम फंड लोन ,, ,, | ६४ | ८ | ० |
| श्री पुजा खर्च ,, ,, | ४०४७ | २ | [illegible] |
| श्री घोडा खर्च ,, ,, | ९९ | १ | ९ |
| श्री रोषनाई खर्च ,, ,, | १२२ | १३ | ६ |
| श्री पगार खर्च ,, ,, | २९६ | ६ | ६ |
| लेंडी आमराई खर्च ,, ,, | ६३४ | १४ | ० |
| | ८५ | २ | ० |
| | १०९६७ | १ | २ |
| श्री शिलक पुढील वर्षासाठी | *२५९२ | ११ | ० |
| | १३५५९ | १२ | २ |

* याशिवाय श्री इंपिरीयल व्यांक आफ इंडियाकडे सेव्हिंग व्यांकेत शिल्लक आहे ती रु.१४४५-७ ६

व सिक्युरिटीज आहेत त्या:–

६ टक्के १९२७ वारलोन ६५००

६ टक्के न्यु. म्युनिसिपललोन ३०००

एकूण रु. ९५००

दासगणू.
अध्यक्ष

हरि सीताराम दीक्षित, चिटणीस

गोविंद रघुनाथ दाभोळकर, खजिनदार.

## परिशिष्ट ( ड )

## श्री सद्गुरु सांईनाथ प्रसन्न.

शके १८४६ चे खर्चाचें बजेट खालीं लिहिल्याप्रमाणें मंजूर करण्यांत आलें.

| | | | |
|---|---|---|---|
| पूजाखर्च | २०० | रिपेअर खर्च. | |
| भोजनखर्च | २०० | जाळी व कमानीसाठीं | १०० |
| रोषनाई | ३५० | रथाची खोली | ५० |
| घोडा | २०० | मशीद सभामंडपाची फरशी दुरुस्ती | ५० |
| नंदादीप | २०० | भांडी दुरुस्ती | ५० |
| धुनी सर्पण | १०० | | |
| पगार | ६४० | किरकोळ दुरुस्ती. | १०० |
| दक्षिणा | ४०० | | |
| शिर्डी किरकोळ | १५० | एकून | ३५० |
| मुंबई ऑफिस | २०० | | |
| तसलमात. | १८० | | |
| एकूण | २८२० | | |
| | | एकंदर एकूण बेरीज | ३१७० |

रा. रा. निळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे सरकारी पेन्शनर यांनी पाठवि-लेलें प्रार्थनादशक.

## श्रीसद्‌गुरु-प्रार्थना-दशकम्

श्रीसाईनाथगुरवे तीव्रवैराग्यमूर्तये ॥
सच्चिदानंदरूपाय भूयो भूयो नमो नमः ॥ १ ॥

परिच्छेदत्रयातीतमपारतप आश्रयम् ॥
वाङ्मनोभ्यामनासाद्यं गुरुपादं नमाम्यहम् ॥ २ ॥

परब्रह्म स्वरूपाय नित्यज्ञानमयायच ॥
महेश्वरायाचिंत्याय सद्बोधाय नमो नमः ॥ ३ ॥

भक्तवात्सल्यहेतुत्वात्संभूताय कृपावते ॥
तुभ्यं दयासागराय सर्वं कालं नमो नमः ॥ ४ ॥

अनाश्रयस्य दीनस्य त्वमेव शरणं मम ॥
त्वत्प्रसादाद्विना ज्ञानमगम्यं मे दयानिधे ॥ ५ ॥

अतर्क्यायाप्रमेयाय सर्वभूतात्मने नमः ॥
ज्ञानवैराग्यसिध्यर्थं भिक्षां मे देहि सद्गुरो ॥ ६ ॥

गीतार्थबोधकर्तात्वमज्ञानं छेत्तु मर्हसि ॥
निजस्वभावकारुण्याद्देहि मे विमलां मतिम् ॥ ७ ॥

गीतार्थस्य विपर्यास प्रवृत्तोऽस्ति दिने दिने ॥
हृदयं दीर्यते तेन त्रायस्व जनतां प्रभो ॥ ८ ॥

त्वदन्यः संशयानां न च्छेत्ता ह्युपपद्यते ॥
कृपयापरयाविष्टं ज्ञानस्फूर्त्याद्य पाहिमाम् ॥ ९ ॥

इत्येनां निजदासस्य विज्ञप्तिं श्रृणु हे प्रभो ॥
गीतार्थतत्व बोधार्थं नीलकंठं च पाहिमाम् ॥ १० ॥

रा. रा. रामचंद्र सीताराम देव राहणार अंधेरी यांनी गुरुपौर्णिमा तारीख ६।७।१९२५ रोजी सकाळी म्हटलेली

# स्वरचित भूपाळी.

उठा उठा सकळ जन । पाहूं चला साई चरण ॥
तुटोनि जाईल भवबंधन । भावें चरण पाहतांची ॥
त्यांचें होतांची दर्शन । तृप्त होतील नयन ॥
भावें घालोनी लोटांगण । चरण तुम्ही वंदा ते ॥ १ ॥

कोटी तीर्थें चरणापाशीं ॥ त्या चरणीं सद्भावेंसीं ॥
नमुनी तुम्ही अहर्निशीं । जन्म मरण चुकवा कीं ॥ २ ॥

रूप पाहतांची लोचनीं । सुख होईल साजणी ॥
अज्ञान जाऊनि तत्क्षणीं । ज्ञानज्योति प्रगटेल ॥ ३ ॥

जपा " साईनाथ " निर्धारी । नाम पावन चतुराक्षरी ॥
तेणें चुकूनी तुमची फेरी । मोक्षपद मिळेल कीं ॥ ४ ॥

परब्रह्म हें अवतरलें । म्हणूनि नाम तें पावलें ॥
आतां जपा तेंची पहिलें । तुम्हा सूख व्हावया ॥ ५ ॥

साईनाम हाचि वन्ही । महत्पापें तीं तत्क्षणीं ॥
तृणवत् टाकील जाळूनी । प्रातःकाळीं स्मरतांची ॥ ६ ॥

धर्मलोप बहू झाला । तेणें भूमार वाढला ॥
म्हणूनी समर्थ अवतरला । जड मूढ ताराया ॥ ७ ॥

प्रातःकाळीं दर्शन घेतां । मुक्ति मिळेल सायुज्यता ॥
तेणें चुकेल जन्मव्यथा । भावें दर्शन घेतांची ॥ ८ ॥

रूप सुंदर सुकुमार । दिसे अति मनोहर ॥
पाहून तेंचि सत्वर । कृतार्थ तुम्ही व्हाल कीं ॥ ९ ॥

सत्य सांगे सितारामसुत । साई पाहा हो प्रेमयुक्त ॥
तेणें व्हाल जन्ममुक्त । संदेह कांहीं असेना ॥ १० ॥

## अभंग

शके १८४७ आषाढ शुद्ध १५ सोमवार सकाळीं गुरुपौर्णिमेचे दिवशीं श्रीसाईबाबापाशीं त्यांनीं म्हटलेले अभंग:-

आतां साईनाथा परिसा विज्ञापना । दासाची करुणा येऊं द्यावी ॥
नेणोनियां सोय फिरलों दिशा दाहीं । झालें दुःख देहीं बहुसाल ॥ १ ॥
तुमची ब्रीदावळी पतीत पावन । कीर्तिही ऐकून शरण आलों ॥ २ ॥
माझा माय बाप गण गोत बंधू । साई कृपासिंधू गुरुराय ॥
आतां कांहीं नेणें तुमच्या पायाविणें । संसारीचे पेणें दूरी करा ॥ ३ ॥
जोडोनियां कर शीर पायांवरी । ठेविलें निर्धारी साईनाथा ॥ ४ ॥
तुज साईनाथा काय सांगूं आतां । माझी सर्व चिंता असों द्यावी ॥ ५ ॥
नेणें भक्ति ज्ञानकर्म उपासना । तुझीया चरणा ध्यात असें ॥ ६ ॥
पतीत मी पापी दुर्गुणी आगळा । परी आलों शरण तुज साई ॥
पतीत तारीले पशू उद्धरीले । पक्षीही लावीले मोक्षपंथा ॥
रामचंद्र म्हणे ऐशी तुझी ख्याती । आलों शरणागती साईनाथा ॥ ७ ॥

## अष्टक

भकास्तव प्रकट होउनि शिर्डिग्रामीं । केलें कृतार्थ अवघे जन पूर्णकामी ॥
नेणें परीच चुकवी मम जन्मफेरे । आद्यापि साई तुज कां करूणा नये रे ॥१॥

विश्वासलों दृढ मनें तुझिया पदासीं ॥ कीं वारिसील म्हणुनी मम आपदांसी ॥
तें दाविशील नयनीं कधि सांग बारे । अद्यापि साई तुज कां करुणा नये रे ॥२॥

मी हीन दीन कुमती तुज वर्म ठावें । ऐशावरी त्यजुनि कोप उदार व्हावें ॥
गाती तुझें पतितपावननाम सारे । अद्यापि साई तुज कां करुणा नये रे ॥३॥

माझें अपार तमपातक सर्व जाळी । क्रोधाग्निनें हरि तुझ्या सह मूळ जाळी ॥
तैसा करी दृढ जसा भव बंध वारे । अद्यापि साई तुज कां करुणा नये रे ॥४॥

श्रीपद्महस्त मम मस्तकिं ठेवि बाबा । दृष्टीस दाखवि वरें निज चित्स्वरूपा ॥
हें दान दे वचन आन न मी वदें रे । अद्यापि साई तुज कां करुणा नये रे ॥५॥

वेचावयासी करुणाधन लोभवाटे । दे भीक दावुनि कला कृत लावि वाटे
नाहीं तरी झडकरी मज भेट दे रे । अद्यापि साइ तुज कां करुणा नये रे ॥६॥

पाप्यांसि तारुनि वळें जन तोषवीले । तूझेंच कार्य तुज मुख्य फळासि आलें ॥
तें सोडितां तुज सुटेल तरी कसें रे । अद्यापि साइ तुज कां करुणा नये रे ॥७॥

ही रामचंद्ररचिताष्टक पुष्पमाला । प्रेमें समर्पिली तया गुरुराज याला ॥
आमोद तो रुचिर सेवुनि साई धाला । तेणें प्रसन्न निज भक्तजनांसि झाला ॥८॥

मु० आंधेरी तालुके० दक्षिण साष्टी.

जि० मुंबई सबर्बन.

११–७–२५

आपला नम्र,

**रामचंद्र सीताराम देव.**

## संस्थानच्या नेमणूका.

ता. २६-४-२५ रोजी भरलेल्या संस्थान कमेटीच्या सभेत रा. रा. हरि सीताराम दीक्षित यांनां चिटणीस व रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांनां खजिनदार नेमण्यांत आलें. नियमाप्रमाणें रा. रा. दीक्षितांनीं दुय्यम चिटणीसांचे जागेवर रा. रा. रामचंद्र दादा पाटील कोते यांची नेमणूक केली व रा. रा. दाभोळकरांनीं दुय्यत खजिनदारांचे जागेवर रा. रा, रघुवीर भास्कर पुरंदरे यांची नेमणूक केली. या सर्व नेमणूका शके १८४७ पासून तीन वर्षांपुरत्या आहेत.

कळविण्यास वाईट वाटतें कीं शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळापैकीं राव बहादूर दामोदर विनायक कीर्तने (चीफ जस्टीस आणि लॉ मेंबर इंदोर) व रा. रा. रामकृष्ण गणेश ताम्हने ( व्हॅक्सिनेटर एंरडोल ) व त्यांचें वडील रा. रा. गणेश व्यंकाजी ताम्हने यांनां देवाज्ञा झाली. इश्वर त्यांनां सद्गती देवो.

### अभिप्राय—

मंदार-पुष्प-माला पुष्प पहिलें, संपादक श्रीयुत श्री. के. गोखेगांवकर, प्रकाशक श्रीयुत दिगंबर गणेश उदगीरकर, नांदेड. एके काळीं नांवाजलेल्या परंतु हल्लीं कांहीं अंशीं खालावलेल्या निजाम शाहींतील महाराष्ट्रीय समाजमध्यें आपल्या वाङमयासंबंधीं अलीकडे बरीच जागृती झालेली दिसत आहे. आपलें ललितवाङमय सुधारावें, जनतेला वाचनाची अभिरुचि उत्पन्न व्हावी अशा उच्च हेतूनें प्रेरित होऊन निरनिराळ्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत. एक वर्षापूर्वी श्रीयुत गणेश अनंत सराफ यांनीं आख्यान-रत्न-माला सुरू करून त्या तऱ्हेच्या वाङमयाची सेवा व जोपासना चालविली आहे. श्रीयुत देवीदास लक्ष्मण महाजन यासारखे प्रतिभा संपन्न कवी सुरस काव्यामध्ये भर टाकीत आहेत. औरंगाबादच्या शिक्षण प्रसारक मंडळानें अरुणोदयमाला सूरू करून महाराष्ट्र वाङमयाची सेवा चालविली आहे. हैदराबादच्या मराठी साप्ताहिक निजाम विजयानं मोडी लिपीचें पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम केला आहे. अशा तऱ्हेचे निरनिराळ्या दिशेनें प्रयत्न सुरू आहेत. मंदार-पुष्प-माला याच सद्हेतूनें प्रेरित होऊन निघाली आहे. या मालेचीं वर्षांतून चार पुष्पें बाहेर पडणार आहेत. प्रयत्न स्तुत्य आहे. मोल्ही फार नाहीं. अवघा १॥ रु.

या पहिल्या पुष्पांत कै. विष्णु शास्त्री चिपळूणकर यांचें छाया-चित्र दिलें आहे. व हें पुष्प त्यांचेंच चरणी अर्पण केलें आहे.

या पुष्पांतील सर्व लेख व कविता चांगल्या आहेत. फिरस्यांचा "दुर्गुणांचा चरितार्थ" हा विनोदी लेख, कित्येक नियतकालिकांत अलीकडे बोकाळलेल्या पाणचट विनोदी लेखाप्रमाणें नसून खरा विनोदी मार्मिक लेख आहे. ही माला चिरायु होवो व अशाच तऱ्हेचे आणखी पुष्कळ प्रयत्न निजामशाहींत होऊन महाराष्ट्र वाङ्मयाचा तिकडे जास्त प्रसार होवो असें आम्ही इच्छितों.

## अध्याय ३१ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

गताध्यायीं जाहलें कथन । सप्तशृंगीच्या भक्ताचें आख्यान ॥
माधवरावांचा नवस ही पूर्ण । साई फेडून घेववित ॥ १ ॥
कैसें दिधलें स्वप्नीं दर्शन । खुशालशेट रामलाला लागून ॥
कैसियापरी घेतलें ठेवून । आनिर्वाण रामलालाला ॥ २ ॥

त्याहून अपूर्व ही मत्कृत कथा । श्रोतां परिसिजे अति सादरता ॥
संन्यासी एक मानसा[१] जातां । कैसा निज मुक्तता लाधला ॥ ३ ॥
कैसा मानकर[२] नूलकर[३] मेघा । यांचा ही हेतू पुरविला अवघा ॥
हे तर नर परि एका क्रूर वाघा । निजपदीं जागा दीधली ॥ ४ ॥

कथा आहेत अति विस्तृत । ग्रंथ विस्तार होईल बहुत ॥
कथीन संक्षिप्त सारभूत । होईल निजहित साधक ॥ ५ ॥
अंतःकाळीं जैसी मती । तैसी प्राण्यांस लाभे गती ॥
किडे भीतीनें भ्रमर होती । हरिणप्रीती[४] जडभरत ॥ ६ ॥

---

१ मानससरोवरास. २ बाळकराम मानकर. ३ तात्यासाहेब नूलकर
४ हरिणीवर जडलेल्या प्रीतीनें.

अंतःकाळीं जें जें ध्यान । तें तेंच रूपें पुनर्जनन ॥
भगवत्पदीं झालिया लीन । जन्म विहीन होई तो ॥ ७ ॥
याच करितां नामस्मरण । लाविला अभ्यास हेंच कारण ॥
प्रसंगीं जावें न गांगरून । अंतीं आठवण रहावी ॥ ८ ॥
आयुष्यभर जागृत राहिला । अंतःकाळीं जरी का निदेला ॥
तरी तो शेवटीं फुकट गेला । यदर्थ केला सत्संग ॥ ९ ॥
म्हणूनि जे भक्त भावार्थी । ते जीव निरविती संता हातीं ॥
कीं ते जाणती गती निर्गती । अंतींचे सांगाती ते एक ॥ १० ॥
ये अर्थाची गोड कथा । साई समोर घडलेली वार्ता ॥
ऐकतां दिसेल श्रोतयां चित्तां । भक्तवत्सलता साईची ॥ ११ ॥
कोठें मद्रास कोठें शिरडी । कोठें मानस सरोवरदरडी ॥
कैसी भक्तांची भरतां घडी । आणित ओढीत पायांपाशीं ॥ १२ ॥
एकदां एक मद्रासी संन्यासी । विजयानंद नाम जयासीं ॥
मद्रासेहून मानस सरोवराशीं । महदुल्हासीं निघाला ॥ १३ ॥
एका जपानी प्रवाशाचा । नकाशा मानससरोवराचा ॥
पाहून निश्चय झाला मनाचा । दर्शनाचा उत्कट ॥ १४ ॥
वाटेंत लागला शिरडी गांव । कर्णी पडला नामाचा प्रभाव ॥
दर्शनाची धरूनि हांव । आले ठाव शोधित ॥ १५ ॥
साई महाराज मोठे संत । कीर्तिमंत जगविख्यात ॥
ऐकूनी धरिला दर्शनीं हेत ॥ थांबलें मार्गांत जाताना ॥ १६ ॥
होते तेव्हां शिरडीमाजी । हरिद्वारचे स्वामी सोमदेवजी ॥
उभयतांची भेट सहजी । भक्त समाजीं जाहली ॥ १७ ॥
तयांस मग संन्यासी पुसती । मानस सरोवर तें दूर किती ॥
पांचशें मैल स्वामी म्हणती । गंगोत्रीवरती आहे तें ॥ १८ ॥

तेथें बर्फ फारचि पडतें । पन्नास कोसांत भाषा बदलते ॥
भूतानवासीयां शंका येते । परस्थानें बहु पीडा ॥ १९ ॥
स्वामीमुखींचें वर्तमान । परिसोन संन्यासी खिन्न वदन ॥
जाहलें तयाचें दुश्चित्त मन । चिंतानिमग्न झाला तो ॥ २० ॥
घेतलें साईबाबांचें दर्शन । घातलें पायीं लोटांगण ॥
चित्त झालें सुप्रसन्न । बसले आसन घालुनी ॥ २१ ॥
तों बाबांची खवळली वृत्ति । मग ते तेथील मंडळीस म्हणती ॥
द्या हाकलून या संन्याशाप्रती । नाहीं संगती कामाची ॥ २२ ॥
आधीं संन्यासी तो नवा । स्वभाव बाबांचा नाहीं ठावा ॥
जरी खजील झाला जीवा । पहात सेवा बैसला ॥ २३ ॥
प्रातःकाळींचा दरबार । मशीदींत मंडळी चिक्कार ॥
भक्तोपचार पूजा संभार । पाहून तो गार जाहला ॥ २४ ॥
कोणी बाबांचे पाय धूती । पळींत अंगुष्ठतीर्थ घेती ॥
शुद्ध सद्भावें सेवन करिती । नेत्र स्पर्शिती तैं कोणी ॥ २५ ॥
कोणी लाविती तयांस गंध । कोणी फांसिती अत्तर सुगंध ॥
ब्राह्मण शूद्रादि जाति निर्बंध । गेले संबंध विसरूनी ॥ २६ ॥
बाबा जरी भरले रागें । संन्यासी उचंबळले अनुरागें ॥
तयाचें पाऊल न निघे मागें । बैसल्या जागें उठेना ॥ २७ ॥
राहिला शिरडींत दोन दिवस । इतुक्यांत पत्र आलें तयास ॥
अत्यावस्थ माता गावांस । तेणें उदास तो झाला ॥ २८ ॥
आईस भेटावें आलें मनीं । परत जावें स्वदेशालागुनी ॥
परी न बाबांचे आज्ञेवांचुनी । पाऊल तेथुनि काढवे ॥ २९ ॥
मग तें पत्र घेऊनि हातीं । संन्यासी गेला मशिदीप्रती ॥
बाबांस करूं लागला विनंती ॥ मातेची स्थिती निवेदुनी । ३०

महाराज साई समर्था । मनीं मातेच्या भेटीची आस्था ॥
आज्ञा दीजे प्रसन्न चित्ता । मज मार्गस्था कृपा करीं ॥ ३१ ॥
थांबोनी लागला बाबांचे चरणीं । होईल कीं आज्ञा कृपा करुनी ॥
माता प्राण कंठीं धरुनी । असेल धरणीं खिळिलेली ॥ ३२ ॥
असेल पाहत माझी वाट । घेऊं द्या मज दृष्टि भेट ॥
होतील तिचे सह्य कष्ट । सुखें शेवट होईल ॥ ३३ ॥
साई समर्थ अंतर्ज्ञानी । त्यांचेंच आयुष्य सरलें जाणुनी ॥
वदती काय तया लागुनी । चित्त देऊनी तें परिसा ॥ ३४ ॥
होता इतुका मातेचा ळळा । तरी कां हा वेष स्वीकारिला ॥
साजेना ममत्व या वेषाळा । कलंक भगव्याला लाविला ॥ ३५ ॥
जा बैस त्वां व्हावें न उदास । जाऊं दे कीं थोडे दिवस ॥
करूं मग पुढील विचारास । धीर त्वां चित्तास धरावा ॥ ३६ ॥
वाड्यांत असती बहुत चोर । कवाडें लावोनि रहावें हुशार ॥
सर्वस्वाचा करितील अपहार । घाला अनिवार घालितील ॥ ३७ ॥
वैभव कधींही नव्हें शाश्वत । शरीर हें तो सर्वदा अनित्य ॥
जाणू-नि मृत्यु नित्य सन्निहित । धर्म जागृत ठेवावा ॥ ३८ ॥
देह स्त्री पुत्रादिकीं ॥ अहंममाभिमान जो लोकीं ॥
तत्प्रयुक्त तापत्रिकीं । अनर्थ ऐहिकी या नांव ॥ ३९ ॥
दुजा अनर्थ आमुष्मिक । जन जे जे परलोककामुक ॥
परलोक ही मोक्ष प्रबंधक । अधोमुख सर्वदा ॥ ४० ॥
तेथें नाहीं पुण्योपचय । तेथील प्राप्ती नाहीं निर्भय ॥
क्षीण पुण्यें पतनभय । आहे निःसंशय तेथेंही ॥ ४१ ॥

---

१ अधिदैविक अधिभौतिक आणि अध्यात्मिक २ पारलौकिक
३ पतनोन्मुख

तरी हे ऐहिक आमुष्मिक । उभय ही भोग अनर्थावहक ॥
तयांचा त्याग निःशेख । आद्योत्पादक आनंदा ॥ ४२ ॥

संसारास जे जे विटले । अढळ हरि पदीं जे जे विनटले ॥
तयांच्या बंधाचें विरडेंच फिटलें । धरणें उठलें अविद्येचें ॥ ४३ ॥

हरि भजन स्मरणाची घडी । पाप ताप दैन्य दवडी ॥
ध्यानासि आणितां बहु आवडी । संकटीं उडी घाली तो ॥ ४४ ॥

तुझी पूर्व पुण्याई गहन । तेणेंच आलासि हा ठाव ठाकून ॥
आतां मद्वचनीं द्यावें अवधान । करुनि घे साधन जीवाचें ॥ ४५ ॥

उद्यांपासून भागवताचें । परिशीलन करावें साचे ॥
तीन सप्ताह त्या ग्रंथाचें । काया वाचे मनें करी ॥ ४६ ॥

होऊनियां निर्वासन । करी त्या ग्रंथाचें श्रवण ॥
अथवा मनोभावें वाचन । निदिध्यासन तत्पर ॥ ४७ ॥

प्रसन्न होईल भगवंत । सर्व दुःखांचा करील अंत ॥
होईल माया मोह शांत । सौख्य अत्यंत लाभेल ॥ ४८ ॥

होऊनिया शुचिर्भूत । ठेवूनी हरिचरणीं चित्त ॥
संपादी हें सांग व्रत । मोहनिर्मुक्त होशील ॥ ४९ ॥

आला निकट स्वदेहा अपाय । पाहूनि बाबांनीं हाच उपाय ॥
योजिला वाचविला रामविजय । जेणें मृत्युंजय संतुष्टे ॥ ५० ॥

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं । सारोनि मुखमार्जन अंघोळी ॥
वाहूनि बाबांस पुष्पांजुळी । चरणधुळी वंदिली ॥ ५१ ॥

बगलेस मारिलें भागवत । पाहिजे वाचावयास एकांत ॥
लेंडीस्थान मौजेचें शांत । पडलें पसंत तयांसी ॥ ५२ ॥

---

१ स्वत: साईबाबांनी आपलें देहस

गेले बैसले घालूनि आसन । सुरू केलें पारायण ॥
संन्यासीच ते भगवत्परायण । केलें संपूर्ण दोन सप्ते ॥ ५३ ॥

करूं घेतां तिसरा सप्ता । वाटली एकाएकीं अस्वस्थता ॥
वाढूं लागली अशक्तता । टाकिला अपुरता तैसाच ॥ ५४ ॥

आला वाडियांत परतोन । काढिले कष्टें दिवस दोन ॥
उजाडतां तिसरा दिन । बुवांनीं नयन झांकिले ॥ ५५ ॥

ठेवूनिया निजशिर । फकीर बावांचे मांडीवर ॥
संन्यासी झाला तेथें स्थिर । मुक्तशरीर विदेही ॥ ५६ ॥

संन्याशाचें देहावसान । होतां बावांस निवेदन ॥
जाहलें तयांचें आज्ञापन । देह दिनभर ठेवावा ॥ ५७ ॥

इतक्यांत टाकूं नका पुरून । होईल त्याचें पुनर्जीवन ॥
लोकांनीं बहु आशा धरून । केलें रक्षण देहाचें ॥ ५८ ॥

गेला एकदां प्राण निघून । तो काय ये मागें परतोन ॥
परी बावांचा शब्द प्रमाण । देहाचें जतन तें केलें ॥ ५९ ॥

परिणामीं तें फळा आलें । निवारसी प्रेत रक्षिलें गेलें ॥
पोलिसांचे संशय फिटले । जीवन कसलें मेल्यांचें ॥ ६० ॥

हें काय बावांस नव्हतें ठावें । कीं मेलेलें कैसें उठावें ॥
हेतू न योग्य चौकशी अभावें । भुईंत दाटावें त्या प्रेता ॥ ६१ ॥

निवारसीचा राजा धणी । चौकशी करी आकस्मिक मरणीं ॥
व्हावी न आधींच प्रेताची दाटणी । म्हणोन वतावणी बावांची ॥ ६२ ॥

असो पुढें हें सर्व झालें । यथाविधी प्रेत तें संस्कारिलें ॥
योग्य स्थळीं मग तें पुरलें । कार्य उरकलें संताचें ॥ ६३ ॥

ऐसीच आणीक एक वार्ता । श्रोतयां लागीं कथितों आतां ॥
परिसा क्षणभर सादर चित्ता । दिसेल व्यापकता साईची ॥ ६४ ॥

भक्त एक बाळाराम । मानकर जयाचें उपनाम ॥
होते बाबांचे भक्त परम । गृहस्थाश्रम करून ॥ ६५ ॥

परी पुढें तयांची भार्या । पंचत्व पावूनि आश्रमकार्या ॥
व्यत्यय आला अंतरले स्थैर्या । परमैश्वर्या ते चढले ॥ ६६ ॥

पूर्वार्जित फलप्राप्ति । लाधली साई चरण संगती ॥
जडली तेथें निश्चल भक्ति । पूर्ण विरक्ति संसारीं ॥ ६७ ॥

आशापाश मुलें बाळें । तोडूनिया हे बंध सगळे ॥
पहा मानकर दैवा आगळे । संसारा वेगळे जाहले ॥ ६८ ॥

परमार्थ द्वाराची अर्गळा । परसेवेची मोहनमाळा ॥
घालूनिया निजपुत्रांचे गळां । ऐहिका टाळा दीधला ॥ ६९ ॥

हाही एक जातीचा संन्यास । संन्यासाच्या परी बहुवस ॥
परी जो नव्हे ज्ञानगर्भन्यास । उपजवी त्रास पदोपदीं ॥ ७० ॥

म्हणून हा साई उदारमूर्ति । मानकराची अनन्य भक्ति ॥
कृपा करावी आलें चित्तीं । केली विरक्ती दृढ त्याची ॥ ७१ ॥

अनंत जन्मीचे संस्कार पटल । चंचल मन राहीना अचल ॥
मनोराज्याचे तरंग प्रबळ । वैराग्य अढळ ठरेना ॥ ७२ ॥

शिरडीच नव्हें माझें स्थान । मी तो देश काळानवच्छिन्न ॥
दावावया हें सप्रमाण । करीत आज्ञापन मानकरां ॥ ७३ ॥

पुरे झाली आतां शिरडी । ही घे खर्ची बारा[1]रोकडी ॥
तपार्थ जाई मछिंद्रगडीं । सुख निर्वडीं वस तेथें ॥ ७४ ॥

---

१ बारा रुपये

परिसूनि ऐसें साईवचन । आज्ञा करूनि शिरसा वंदन ॥
घालूनि साष्टांग लोटांगण । केलें अभिवंदन पायांचें ॥ ७५ ॥

होऊनिया अति विनीत । वदे बाळाराय साईप्रत ॥
नाहीं आपुलें दर्शन जेथ । काय त्यां तेथ करावें ॥ ७६ ॥

येथें नित्य पायांचें दर्शन । घडें चरणतीर्थ सेवन ॥
होई अहर्निश सहजीं चिंतन । तेथें मी अकिंचन एकला ॥ ७७ ॥

तरी बाबा आपणा विरहित । काय तेथें माझें स्वहित ॥
हें आकळाया नाहीं मी समर्थ । धाडितां मज किमर्थ ते स्थानीं ॥७८॥

परी न भक्तें धरावा अल्प । निज गुरु वचनीं ऐसा विकल्प ॥
तात्काळ मनांत उठला संकल्प । निर्विकल्प मानकर ॥ ७९ ॥

म्हणे बाबा क्षमा कीजे । क्षुद्र बुद्धीचे विचार माझे ॥
झालों शंकित तेणें मी लाजें । शंका न साजे ही मज ॥८० ॥

मी तो अपुला आज्ञाधर । राहून नामस्मरण तत्पर ॥
केवळ अपुल्या सामार्थ्यावर । गडावरही राहीन ॥ ८१ ॥

तेथें ही करीन आपुलें ध्यान । अपुल्या कृपामूर्तीची आठवण ॥
अपुल्याच पायांचें चिंतन । हेंचि चिरंतन तप माझें ॥ ८२ ॥

अनन्य शरण मी तुम्हाप्रती । माझी गमनागमन स्थिती ॥
दिधली असतां तुम्हा हातीं । हा कां चित्तीं विचार ॥ ८३ ॥

तवाज्ञेची निज सत्ता । तेथेंही मनास देईल शांतता ॥
ऐसी तुमची असतां समर्थता । व्यर्थ कां चिंता वाहूं मी ॥ ८४ ॥

साई समर्थ ब्रह्म सनातन । ब्रह्मलिखित तयाचें वचन ॥
पाहील जो विश्वास ठेवून । घेईल पूर्ण अनुभव तो ॥ ८५ ॥

मग बाबा वदती तयासी । सावधान होऊनि मनासी ॥
परिस गा तूं मद्वचनासीं विकल्प सायासीं पडूं नको ॥ ८६ ॥

जाई मच्छिंदरगडीं सत्वर । करी प्रत्यहीं तप त्रिवार ॥
कांहीं काळ क्रमिल्यावर । स्वानंद निर्भर होसील ॥ ८७ ॥

ऐकतां ऐसें आश्वासन । मानकरासीं पडलें मौन ॥
पुढें मी काय बोलूं दीन । गडाभिगमन आरंभीं ॥ ८८ ॥

पुनश्च लागोनि साई चरणा । पावोनि उदी प्रसादाशिर्वचना ॥
मग मानकर स्वस्थ मना । मच्छिंदर भुवना निघाले ॥ ८९ ॥

ठाकोनिया तें रम्य स्थान । जेथें शुद्ध निर्मळ जीवन ॥
मंद मंद वाहे पवन । समाधान पावले ॥ ९० ॥

ऐसे मानकर साई प्रयुक्त । असतां गडावर साई वियुक्त ॥
आचारिते झाले तप यथोक्त । यथानियुक्त राहूनि तें ॥ ९१ ॥

पहा बाबांचा चमत्कार । तपनिमग्न असतां मानकर ॥
प्रत्यक्ष दिधलें दर्शन गडावर । झाला साक्षात्कार तयांस ॥ ९२ ॥

होईल दर्शन समाधिस्था । यदर्थीं कांहीं नाहीं आश्चर्यता ॥
परी आसनस्थित उत्थानावस्था । असतां श्री समर्था देखिलें ॥ ९३ ॥

नाहीं केवळ दृष्टी देखिले । बाळकरामें समक्ष पुसिलें ॥
कां मज बाबा येथें धाडिलें । काय दिधलें प्रत्युत्तर ॥ ९४ ॥

शिरडींत असतां अनेक कल्पना । उठूं लागले तरंग नाना ॥
म्हणोनि तुझिया चंचल मना । गडप्रयाणा नेमियलें ॥ ९५ ॥

पृथ्वी आपादिकांचा गारा । रचोनि रचियेलया या अगारा[1] ॥
साडे तीन हाताचिया घरा । शिरडी बाहेरां नव्हतों तुज ॥ ९६ ॥

---

१ घरा.

आतां जो येथें तोच की तेथें । पाहूनि येई स्वस्थ चित्तें ॥
तेथूनि जें ध्यां पाठविलें तूतें । तेंयेच निमित्तें तूं जाण ॥ ९७ ॥

असो पुढें हे मानकर । उद्दिष्ट काळ क्रमिल्यावर ॥
यावया अपुल्या मुक्कामावर । सोडिला मच्छिंद्रगड त्यांनीं ॥ ९८ ॥

बांद्रे ग्राम वसतिस्थान । यावें तेथें जाहलें मन ॥
दादरपर्यंत पुण्याहून । योजिलें प्रयाग अग्निरथें ॥ ९९ ॥

गेले पुण्याचे स्टेशनावर । येतां तिकीट घेण्याचा अवसर ॥
होतां खिडकीपाशीं सादर । वर्तला चमत्कार तंव एक ॥ १०० ॥

लंगोटी एक कटिप्रदेशीं । खांदा कांवळी कुणबी वेषी ॥
ऐसा एक अनोळखी प्रवासी । खिडकीपाशीं देखिला ॥ १०१ ॥

घेऊनि दादरचें तिकीट । कुणबी मागें फिरे जो नीट ॥
बाळकरामाची दृष्टादृष्ट । होतांचि निकट पातला ॥ १०२ ॥

म्हणे तुम्ही कोठें जाता । 'दादरास' बाळकराम वदतां ॥
तिकीट देऊनि टाकिलें तत्वतां । म्हणे हें आतां तुम्ही घ्या ॥१०३॥

मीही जाणार होतों तेथें । परी महत्कार्यांतर येथें ॥
कर्तव्य आहे आठवलें मातें । म्हणून जाणें तें राहिलें ॥ १०४ ॥

वेंचितांही गांठीचे दाम । तिकीट मिळविणें कठीण काम ॥
तें जैं लाधे अविश्रम । संतोष परम मानकरां ॥ १०५ ॥

पुढें तें मोल चुकववायाला । खिशांतून जों पैका काढिला ॥
तोंच तो कुणबी दाटींत घुसला । कोठें निसटला कळेना ॥ १०६ ॥

तेव्हां तो कुणबी शोधावयाला । बाळकरामें प्रयत्न वेंचिला ॥
परी तो सर्व निष्फळ गेला । येऊनि ठेला अग्निरथ ॥ १०७ ॥

नाहीं जोडा वहाण पायीं । फटकूर एक वेष्टिलें डोई ॥
खांदीं कांवळ लंगोटी लावी । कुणबी भाई हा कोण ॥ १०८ ॥

भाडें नाहीं थोडें थोकडें । तेंही देऊनि पल्लवचें रोकडें ॥
कां मज आभाराचें सांकडें । घातलें हें कोडें नुलगडे ॥ १०९ ॥

उदार आणि निरपेक्ष स्वांतीं । ऐसा हा कोण कुणबी घरकांती ॥
राहून गेलें अनिश्चित अंतीं । लागली खंती मानकरा ॥ ११० ॥

तैसेच मग ते आश्चर्यचकित । धरोनि भेटीचा पोटीं हेत ॥
अग्निरथ जागेचा हालेपर्यंत । ठेले तटस्थ द्वारांत ॥ १११ ॥

पुढें जेव्हां गाडी सुटली । समूळ भेटीची आशा खुंटली ॥
जाणून गाडीची खीळ पकडिली । उडी मारिली गाडींत ॥ ११२ ॥

गडावरील प्रत्यक्ष गांठ । तैसाच इकडे हा निराळा घाट ॥
पाहून कुणब्याचा विचित्र थाट । लागली चुटपुट मानकरा ॥ ११३ ॥

असो पुढें हे सद्भक्त । साईपदीं पूर्णानुरक्त ॥
दृढ श्रद्धा भक्ति संयुत । जाहले कृतार्थ शिरडींत ॥ ११४ ॥

साई संलग्न पदाब्जरजीं । साईनामाची घालीत रुंजी ॥
भक्त भ्रमर बालकरामजी । शिरडीमाजींच राहिले ॥ ११५ ॥

घेऊनि बाबांचें अनुज्ञापन । मुक्तारामजी सवें घेऊन ॥
कधीं कधीं हे शिरडी सोडून । करीत भ्रमण बाहेर ॥ ११६ ॥

परी शिरडी केंद्रस्थान । वेळो वेळीं येत परतोन ॥
अखेर जाहलें देह विसर्जन । परम पावन शिरडींत ॥ ११७ ॥

धन्य पूर्वकृत भागधेय । होऊनि साईचा दृष्टि विषय ॥
लागून तयां पायीं लय । मरण निर्भय पावे जो ॥ ११८ ॥

धन्य तात्या साहेब नूलकर । धन्य मेघा भक्तप्रवर ॥
अंतीं शिरडींत भजनतत्पर । जिहीं कलेवर[1] विसर्जिलें[2] ॥ ११९ ॥

---

१ शरीर २ मरण

मेघा जेव्हां पावला पंचत्व । पहा तें उत्तरविधान महत्त्व ॥
आणीक बाबांचे भक्त सकळस्त । मेघा तो कृतकृत्य आधींच ॥ १२० ॥

सर्वें घेऊन भक्त समस्त । स्मशान यात्रेस गेले ग्रामस्थ ॥
बाबाही गेले स्मशानाप्रत । पुष्पें वर्षत मेघावर ॥ १२१ ॥

होतां मेघाचें उत्तर विधान । बाबाही झाले साश्रुलोचन ॥
मायानुवर्ती मानवा समान । शोकनिर्विण्ण मानस ॥ १२२ ॥

प्रेमें बाबांनीं निज करें । प्रेत आच्छादिलें सुमन निकरें ॥
शोकही करूनि करुण स्वरें । मग ते माघारे परतले ॥ १२३ ॥

मानवांचा उद्धार करिती । ऐसे संत देखिले बहुतीं ॥
परी साईबावांची ती महती । वर्णन किती करावी ॥ १२४ ॥

व्याघ्रासारिखा क्रूर प्राणी । तो काय मनुष्यापरी ज्ञानी ॥
परी तोही लागे तयांचे चरणीं । अघटीत करणी बावांची ॥ १२५ ॥

ये अर्थाची रम्य कथा । परिसा नीट देऊनि चित्ता ॥
मग कळेल बाबांची व्यापकता । समचित्तता सकळिकीं ॥ १२६ ॥

शिरडीस एकदां चमत्कार झाला । असतां सप्त दिन निर्याणाला[1] ॥
गाडा एक बैलांचा आला । राहिला उभा द्वारांत ॥ १२७ ॥

वरी एक व्याघ्र प्रचंड । गळां जगाचे सांखळदंड ॥
जखडून टाकिला उदंड । भयासूर तोंड मागिलीकडे ॥ १२८ ॥

त्याला कांहीं होती व्यथा । दरवेशी थकलें उपाय करितां ॥
संत दर्शनोपाय सरतां[2] । मानला चित्ता तयांचे ॥ १२९ ॥

होते ते दरवेशी तीन । तो व्याघ्र त्यांच्या जीविकेचें साधन ॥
गांवोगांवीं खेळ करून । करिती गुजरण आपुली ॥ १३० ॥

१ स्वत: साईबाबांचे देहावसानाला २ उत्तम

फिरतां फिरतां त्या बाजूला । कर्णीं आली बाबांची लीला ॥
म्हणती दर्शन घेऊं चला । वाघही नेऊं तें ठायीं ॥ १३१ ॥

चरण तयाचे चिंतामणी । अष्टसिद्धी लोटांगणीं ॥
नवनिधी येती लोळणी । घेती पायवणी तयाचें ॥ १३२ ॥

माथां ठेऊं तया चरणीं । दुवा मागूं व्याघ्रालागुनी ॥
संतांच्या आशिर्वाद वचनीं । कल्याण होईल सर्वांचें ॥ १३३ ॥

एतदर्थ ते दरवेशी । व्याघ्रास उतरविती द्वारापाशीं ॥
घट्ट धरूनि साखळीदंडासी । तिष्ठत द्वारासीं राहिले ॥ १३४ ॥

आधींच हिंस्त्र भयानक मस्त । वरी होता तो रोगग्रस्त ॥
तेणें तो अत्यंत अस्वस्थ । कौतूक समस्त पाहती ॥ १३५ ॥

व्याघ्राची स्थिती बाबांचे कानीं । घातली समग्र दरवेशांनीं ॥
बाबांची आधीं संमती मिळवुनी । आले परतोनी दाराशीं ॥१३६॥

साखळदंड दृढ कसिती । तोडून न पळे ऐसें करिती ॥
मग त्यास सांभाळूनि आणिती । साईप्रति समोर ॥ १३७ ॥

पाहोनि साई तेजोराशी । व्याघ्र येतांच पायरी पासीं ॥
नकळे काय दचकला मानसीं । अत्यादरेंसीं अधोमुख ॥ १३८ ॥

काय पहा चमत्कार । होतां परस्पर नजरानजर ॥
व्याघ्र चढतांच पायरीवर । प्रेमपुरःसर निरीक्षी ॥ १३९ ॥

लगेच पुच्छाचा गोंडा फुलविला । त्रिवार धरित्रीं प्रहार केला ॥
साईचरणीं देह ठेविला । विकळ पडला निश्चेष्ट ॥ १४० ॥

एकदांच भयंकर डरकला । तत्काळ ठायींच पंचत्व पावला ॥
जन सकळ विस्मयापन्न झाला । व्याघ्र निमाला पाहूनि ॥ १४१ ॥

---

१ तीर्थ.

एके परी दरवेशी खिन्न । पुनश्च तेच दिसले प्रसन्न ॥
कीं, रोगग्रस्त आसन्नमरण । प्राणी निर्वाण पावला ॥ १४२ ॥
साधुसंतांचे दृष्टीसमोर । प्राणोत्क्रमणीं पुण्य थोर ॥
कृमी कीटक वा व्याघ्र । पाप समग्र तो तरला ॥ १४३ ॥
कांहीं मागील जन्माचा ऋणी । फेडिलें ऋण झाला अनृणी ॥
देह ठेविला साईचरणीं । अघटित करणी विधीची ॥ १४४ ॥
ठेवितां संत पदीं डोई । जया प्राणिया मरण येई ॥
सवेंच तो उद्धरोनि जाई । हीच कमाई जन्माची ॥ १४५ ॥
असल्यावीण भाग्याचा थोर । संताचिया दृष्टी समोर ॥
पडेल काय उगाच शरीर । होईल उद्धार तयाचा ॥ १४६ ॥
साधूंचिया दृष्टी सन्मुख । देह ठेवितां परमसुख ॥
पीतां विख होय पीयूख । मरणाचा हरिख ना दुःख ॥ १४७ ॥
दृष्टी पुढें संतचरण । असतां जया प्राणिया मरण ॥
धन्य देह तो कृष्णार्पण । पुनर्जनन नाहीं त्या ॥ १४८ ॥
संताचिया दृष्टी सन्मुख । मरण नव्हे तें वैकुंठसुख ॥
जिंकिला तेणें मृत्यु लोक । न पुनर्भव शोक तया ॥ १४९ ॥
संतां देखता देह त्यागिती । तया नाहीं पुनरावृत्ति ॥
तीच सर्व पापांची निष्कृती । उद्धारगती पावला ॥ १५० ॥
आनखाग्र संतावलोकन । करितां करितां जें देहपतन ॥
तया काय म्हणावें मरण । निजोद्धरण तें साचें ॥ १५१ ॥
पाहूं जातां पूर्व विधान । कोणी तरी हा पुण्यवान ॥
मिरवूं जातां विद्याभिमान । पावला अवमान हरिभक्त ॥ १५२ ॥
तयाचिया शापापासूनी । पावला ही क्रूर योनी ॥
उःशाप योगें लागला चरणीं । अभिनव करणी भक्तांची ॥ १५३ ॥

वाटे जाहला त्या उःशाप । साईदर्शनें जळेल पाप ॥
तुटले बंध सरले ताप । झाला आपाप उद्धार ॥ १५४ ॥
पूर्ण सभाग्य असल्यावीण । कैंचें संत दृष्टीपुढें मरण ॥
त्रिताप त्रिपुटी त्रिगुण मर्दन । होऊन निर्गुण ठाकला ॥ १५५ ॥
ऐसा पूर्व कर्मानुबंध । सुटला क्रूर देह संबंध ॥
तुटला लोह श्रृंखळाबंध । ईश्वरी निर्बंध हा एक ॥ १५६ ॥
साधूसंतांच्या चरणापरती । इतरत्र कोठें उद्धार गती ॥
ती लाधतां या व्याघ्राप्रती । प्रसन्न चित्तीं दरवेशी ॥ १५७ ॥
व्याघ्र तयांचें चरितार्थ साधन । व्याघ्र तयांचें कुटुंब पोषण ॥
तया व्याघ्राला येतां मरण । खिन्न वदन दरवेशी ॥ १५८ ॥
दरवेशी महाराजांस पूसती । आतां पुढें कैसी गती ॥
कैसी द्यावी मूठमाती । लावा सद्गति निजहस्तें ॥ १५९ ॥
महाराज म्हणती न करा खंत । येथेंच होता तयाचा अंत ।
तोही मोठा पुण्यवंत । सौख्य अत्यंत पावला ॥ १६० ॥
त्या तक्क्याचे पलीकडे । शंकराचें देऊळ जिकडे ॥
नेऊन त्याला पुरा तिकडे । नंदी निकट द्या गती ॥ १६१ ॥
पुरलिया तेथें तयाप्रती । लाधेल तो ही सद्गती ॥
ऋण निर्मुक्ति बंधमुक्ति । तुमचिया हस्तीं पावेल ॥ १६२ ॥
गत जन्मीचा देणेदार । फेडावया ऋण हा अवतार ॥
तुमचिया बंधनीं साचार । तो आजवर राहिला ॥ १६३ ॥
दरवेशी मग उचलून तयासी । जाते जाहले देऊळा पाशीं ॥
नंदीचिया पश्चात्प्रदेशीं । तया खाचेशीं दाटिति ॥ १६४ ॥
काय तरी चमत्कार वहिला । व्याघ्र तात्काळ कैसा निमाला ॥
प्रकार इतुकाचि असता घडला । विसर पडला असतां कीं ॥ १६५ ॥

परी येथूनि सातवेच दिनीं । बाबांनीं देह ठेविला धरणीं ॥
तेणेंही आठवण वरचेवर मनीं । उचंबळोनि येतसे ॥ १६६ ॥

पुढील अध्याय याहून गोड । बाबाहीं वर्णिलें निजगुरूचें कोड ॥
पुरविली गोखलेबाईची होड । अनुग्रह जोड देउनी ॥ १६७ ॥

हेमाड साईनाथांसी शरण । गुरुहस्तें कूपीं उफराटें टांगवून ॥
कैसी बाबांनीं कृपा संपादन । केली तें श्रवण करावें ॥ १६८ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । दर्शन महिमा नाम ॥ एक
त्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

साल्मजकुरी गोकुळअष्टमी निमित्तें शिर्डी येथील कार्यक्रम खालीलप्रमाणें.

श्रावण व॥ १ बुधवार ता. ५ आगष्ट रोजी नामसप्ताह सुरू होईल
श्रावण व॥ ९ व बुधवार सकाळी नित्याप्रमाणें काकड आर्ती होऊन समाप्त होईल व कीर्तन ह. भ. प. मारुती बुवा यांचें होईल.

१ श्रावण व॥ ८ रोज मंगळवार मध्यरात्रीं श्रीकृष्ण जन्मोत्सव होईल.
२ श्रावण व॥ ९ बुधवार दिवसा भंडारा होऊन दिंडया वगैरेचा समारंभ रात्रौ होईल.

या उत्सवाप्रीत्यर्थ कोणाला कांहीं पाठविण्याचें असल्यास रा. रा. तात्या गणपत पाटील कोते रा. शिर्डी पो. राहातें जि० अहमदनगर या पत्त्यावर पाठविलें जावें कळावें.


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या माळेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.